-७३६-
-१-

पुराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी पूररेषेच्या आंत कोणतेही बांधकाम न होण्याच्या दृष्टीने पूररेषेची आखणी करण्याबाबत -

महाराष्ट्र शासन,
पाटबंधारे विभाग,
शासन परिपत्रक क्र. एफ्डीडब्ल्यू १०८९/२४३/८९/सिं. व्य. [कामे],
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २१. ९. १९८९.

वाचावे :- शासन परिपत्रक क्र. एफ्डीडब्ल्यू १०८९/२४३/८९/सिं. व्य. [कामे],
दिनांक २. ९. १९८९.

परिपत्रक :-

पावसाळयात झालेल्या अतिवृष्टी व पूर यांमुळे काही वेळा शहरांमध्ये/गावांमध्ये नदी किना-यावरील घरांची मोठया प्रमाणावर पडझड होते. पडझड झालेल्या घरांचा पुनर्बांधणी कार्यक्रम महसूल व वन विभागातर्फे हाती घेतांना संबंधित जिल्हाधिका-यांकडून पाटबंधारे विभागाच्या अधिका-यांकडे संबंधित शहरात/गावात पूररेषा आखून देण्याबाबत मागणी आल्यास संबंधित शहरात/गावात पूररेषा आखून देण्याबाबत पाटबंधारे विभागाच्या अधिका-यांनी कशा प्रकारे कार्यवाही करावी याबाबतच्या सूचना संदर्भाधीन परिपत्रकान्वये देण्यांत आलेल्या आहेत. आता पूरक्षेत्र [ Flood Zones ] व संबंधित पूररेषा यांच्या आखणी विषयी तसेच पूरक्षेत्रातील जमिनीच्या वापराबाबत धरण सुरक्षितता संहिता प्रकरण-८, १९८४ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे खालीलप्रमाणे अधिक सविस्तर खुलासा या परिपत्रकाद्वारे करण्यांत येत आहे. त्यामध्ये वापरण्यांत आलेले शब्दप्रयोग, जसे की निषिध्द क्षेत्र, निषेधक पूररेषा इ. यापुढे मराठीत वापरांत आणावेत.

महत्वाच्या पूररेषा हया मुख्यत्वेकरुन दोन प्रकारच्या आहेत. निषेधक पूररेषा की ज्या कोणत्याही वर्षी पूर येण्याच्या शक्यतेमुळे बांधकामाचे दृष्टिकोनातून ते क्षेत्र निषिध्द ठरवितात. नियंत्रक पूररेषा हया पर्जन्यमानाचे दृष्टीने कोणत्याही वर्षी [परंतु साधारण १०० वर्षांत एकदा] ज्या ठिकाणापर्यंत पूर येऊ शकतो, तो तलांक दर्शवितात. म्हणून बांधकामे केली तरी पूर येणारच नाहीं असे गृहित न धरता नियंत्रित प्रकारचे बांधकाम या रेषेखाली परंतु निषिध्द क्षेत्र वगळून करता येईल. ही क्षेत्रे व पूररेषा खालीलप्रमाणे असाव्यात.

अ] निषिध्द क्षेत्र [ Prohibited Zone ] :-

धरणाचे जलाशयातून नियंत्रित पध्दतीने नदीत सोडण्यांत येणारा विसर्ग व तसेच धरणाखालील मुक्त पाणलोट क्षेत्रामुळे येणारा पावसाळयांतील विसर्ग वाहून नेण्यास जे नदीचे मुख्य पात्र व त्याचे लगतचे क्षेत्र आवश्यक असते त्याला " निषिध्द क्षेत्र " म्हणावे. हे प्रत्यक्षांत ठरवितांना सरासरीने २५ वर्षांतून एकदां या वारंवारितेने [ Frequency ] येणारा पूरविसर्ग किंवा प्रस्थापित नदी-पात्राच्या विसर्गक्षमतेच्या दीडपट विसर्ग यांतील जास्तीचा विसर्ग वाहून नेण्यासाठी जे नदीचे पात्र व त्यालगतचे क्षेत्र आवश्यक असेल ते क्षेत्र ", निषिध्द क्षेत्र " म्हणून ठरवावे.

अशा क्षेत्राचा उपयोग फक्त मोकळया जमिनीच्या स्वरुपांत उदा. उद्याने, खेळाची मैदाने किंवा हलकी पिके घेणे [ज्या ठिकाणी पिके घेण्याचा हक्क पारंपारिक वापरामुळे प्रस्थापित झाला आहे अशा ठिकाणी] अशासारख्या कारणांसाठीच केला जावा.

ब] निषेधक पूररेषा [ Blue Line ] :-

नदीचे दोन्ही तीरांवरील निषिध्द क्षेत्राची हद्द ठरविणा-या गावाजवळील अशा पुराच्या हिशोबाने जी पाण्याची पातळी येईल तिच्या समतल रेषांना त्या गावातील " निषेधक पूररेषा " असे संबोधिण्यांत यावे.

क] नियंत्रित क्षेत्र [ Restrictive Zone ] :-

संकल्पित महत्तम पूर वाहून नेण्यासाठी वरीलपेक्षा जास्त वहन-क्षेत्राची आवश्यकता लागेल. संकल्पित महत्तम पूर प्रवाह हा प्रकल्पाचे संकल्पनातील सांडव्यावरुन वाहणारा संकल्पित महत्तम पूर विसर्ग व धरणा-खालील स्वतंत्र पाणलोट क्षेत्रातून तसाच अपेक्षित पूरविसर्ग यांचेमुळे येणारा एकत्रित पूरविसर्ग धरण्यांत यावा. ज्या भागांत धरण नसेल त्या भागांत १०० वर्षांतून एकदा या वारंवारितेचा पूरविसर्ग विचारांत घेण्यांत यावा.

हा संकल्पित महत्तम पूर वाहून नेण्यासाठी लागणा-या क्षेत्रांतून "निषिध्द क्षेत्र" वगळतां उरणा-या नदीचे दोन्ही तिरांवरील क्षेत्रास "नियंत्रित क्षेत्र" असे संबोधिण्यांत यावे. नियंत्रित क्षेत्रातील बांधकामांच्या तळमजल्याच्या जोत्याची पातळी सुरक्षित उंचीपर्यंत असावी, की ज्यामुळे पूरपातळी नियंत्रित क्षेत्रात जास्त प्रमाणांत चढावयाचे आंत अशा इमारतीं-मधील माणसे इमारत सोडून सुरक्षित ठिकाणी सहजतेने जाऊ शकतील. ही उंची हयाशी संबंधित स्थानिक अधिका-यांनी जमिनीचा चढउतार व उपलब्ध रस्त्याचे तलांक इ. बाबी विचारांत घेऊन ठरविणे अपेक्षित आहे. तसेच इमारतींचे बांधकाम अशा प्रकारचे असावे की, जे क्वचित येऊ शकणा-या पुरामुळे कोसळणार नाहीं.

अशा क्षेत्रांतील इमारतींच्या वापराबाबतची बंधने देखील सुस्पष्टपणे विहित असणे आवश्यक आहे. हे करतांना या क्षेत्रामध्ये येणारा संभाव्य पूर व तसेच पुरामुळे होणारी जीविताची हानी व मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी हया क्षेत्रातील लोकांना, जनावरांना व वस्तूंना अल्पावधीची पूरसूचना मिळताच हे क्षेत्र तांतडीने सोडून सुरक्षित स्थळी जाणे / नेणे आवश्यक राहील, याचा विचार व्हावा.

ड] " नियंत्रक पूररेषा " [ Red Line ] :-

नदीचे दोन्ही तिरांवरील नियंत्रित क्षेत्राची हद्द ठरविणा-या समतल रेषांना "नियंत्रक पूररेषा" म्हणून संबोधिण्यांत यावे.

वरील बाबींचा विचार करुन पुराचा संभाव्य धोका असणा-या